<u>तक्रार (यूएलपी) क्र.२४७/२०१७</u> (१६/०७/२०१८) <u>निशाणी क्र.यू—४८</u>

मी निशाणी यू—४८ वर माझे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्यात लिहीलेला सर्व मजकूर खरा व बरोबर आहे व त्याच्यावर माझी सही आहे. मला त्या व्यतिरिक्त काही सांगायचे नाही.

आता मला यादी नि.यू—५० वरील अ.क्र.४ वरील कागद दाखविण्यात आले ते पाहून सांगतो की, ते दि.१०/९/२०१७ची सॅपल स्लीप आहे. सदरच्या स्लीपवर श्री दिपम भोई यांनी एसआयसीच्यावर सही केली आहे. पुढील कागद अनु.क्र. ५ पाहून सांगतो की ही सुध्दा दि०१८/१०/२०१७ ची सॅपल स्लीप आहे. सदर स्लीपवर श्री हनुमंत नागलवाडे यांची सही आहे. सदरली दोन्ही कागदपत्रांना <u>Art-A & B</u> देण्यात येत आहे. आता मला अ.क्र.६ वरील कागदपत्र दाखविण्यात आले व ते सन २०१५चे कॉम्पेनसेटरी ऑफ कार्ड आहे. सदर कार्डावर एम्प्लॉई सहीच्या ठिकाणी माझी सही आहे. व त्यापुढील रेंकमडेडच्या रकान्यात श्री अदमाने यांची सही आहे व ते सुपरवायझर इन चार्ज आहे आणि ॲप्रुवड रकान्यात प्रॉडक्शन मॅनेजर श्री महादेव काळे यांची सही आहे. सदर कार्डाला <u>नि.यू—५५</u> देण्यात येत आहे. तसेच अ.क्र.७ वरील कागदपत्र सन २०१७ करिता असून त्यावर माझी सही आहे व सदरील कागदपत्राला <u>नि.यू—५६</u> देण्यात येत आहे.

आता मला यादी नि.यू—३० वरील अ.क्र.१ दाखविण्यात आले. ते पाहून सांगतो की ते स्कील्ड मॅट्रीक्स चार्ट आहे. सदर कागदपत्रात गुणवत्ता दर्शविली आहे. सदर कागदपत्रावर श्री महेश काळे यांची सही आहे. सदरील कागदपत्रास <u>Art-C</u> देण्यात येत आहे.

<u>सामनेवालेतर्फे श्री.ए.आर.जोशी, वकील यांचेकडून उलटतपास</u>

मी जाबदेणार कंपनीमध्ये सन २०११ पासून कामास लागलो. आज रोजी मी कामावरती नाही. माझे मते नोंव्हबर २०१७ मध्ये मला कमी केले आहे. सदरची केस मला पुन्हा कामावर घेणेकरिता केली आहे.

हे म्हणणे खरे आहे की सन २०११ मध्ये कामास लागलो त्यावेळेस मला कंपनीने नियुक्तीपत्र दिले होते. हे म्हणणे चुकीचे आहे की मला कंपनीने जुनियर सुपरवायझर म्हणून नेमणूक दिली होती. हे म्हणणे चुकीचे आहे की मला कामावरून कमी केले त्यावेळेस मी जुनियर सुपरवायझर होतो. माझे मते मी ऑपरेटर म्हणून काम करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की मी ऑपरेटर म्हणून कंपनीमध्ये काम करीत आहे असा नेमणूक आदेश या कामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे चुकीचे आहे की,मी

औद्योगिक न्यायालय

ऑपरेटर म्हणून कधीही काम केले नाही, म्हणून कंपनीने मला ऑपरेटर पदाचे नेमणूक पत्र दिले नाही. मी या कामी कंपनीने दिलेले नेमणूक पत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर नेमणूक पत्रात मला जुनियर सुपरवायझर असा हुद्दा दिला होतो. हे म्हणणे खरे आहे की सदरचा हुद्दा मला कामावरून कमी करे पर्यत होता. हे म्हणणे खरे आहे की मला जुनियर सुपरवायझर पदाचे नेमणूक पत्र देवून ऑपरेटरचे काम करून घेत असलेबाबतचे तक्रारीचा अर्ज माझे वरिष्ठांकडे किंवा न्यायालयात सादर केला नाही. हे म्हणणे चुकीचे आहे मी जुनियर सुपरवायझर पदाचे काम करीत असल्याबाबत गेल्या पाच वर्षात मी कंपनीकडे तशी तक्रार केली नाही.

हे म्हणणे खरे आहे की मी जाबदेणार कंपनीत कामास लागण्यापूर्वी मी अन्य कंपनीत काम केले आहे. त्या कंपनीचे नाव हायर ॲप्लायन्स इंडिया प्रा.लि. असे होते. सदर कंपनी मध्ये मी ट्रेनि म्हणून १४ महिने काम केले आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की त्या कंपनी मध्ये सुध्दा मी सुपरवायझर म्हणून काम केले आहे.

हे म्हणणे खरे आहे की सामनेवाले कंपनी मध्ये भारतीय मजदूर संघ नावाची मान्यता प्राप्त संघटना आहे. हे म्हणणे खरे आहे की मी त्या संघटनेचा सभासद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मान्यता प्राप्त संघटनेमध्ये काम करणारे कर्मचारी हे ऑपरेटर हुद्दयावर काम करणारे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की त्या ऑपरेटरस वर मी सुपरवायझर म्हणून काम करतो. हे म्हणणे खरे आहे की त्या सर्व कामगारांचे सेवाशर्ती ठरविण्याकरिता कंपनी व संघटनेमध्ये करार होतो. हे म्हणणे खरे आहे की आमचे सेवाशर्ती हे अप्रेझलनुसार दरवर्षी किंवा दोन वर्षे ठरतात. हे म्हणणे चुकीचे आहे की मी कामगार नसल्यामुळे मला अप्रेझल पद्दत लागू आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा व भारतीय मजदूर संघ मधील कर्मचा—यांचा गणवेष वेगळा आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की मी कामगार नसल्यामुळे माझा गणवेष वेगळा आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की मला कंपनी परफॉरम्न्स बोनस देत असे.

याठिकाणी सामनेवालेतर्फे उलटतपास तहकूब करण्यासाठी विनंती केली. उलटतापस पुढील तारखेपर्यत तहकूब.

सही/—

(एम. आर. कुंभार)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, पुणे

पुणे
दि. १६/०७/२०१८

औद्योगिक न्यायालय